**नि.दि.दा.क्र. ३३३/२०२४**
**निशाणी क्र.७२ पासून पूढे**

**<u>वादीतर्फे साक्षीदार क्र.२– (हरीभाउ) यांचा पूढील सरतपास वकील श्री. आर. आर. कुलकर्णी यांच्यामार्फत शपथेवर सूरू:</u>**

१. माझ्या शपथपत्रातील मजकूर माझ्या माहितीप्रमाणे बरोबर आहे. आज मी पूराव्याच्या शपथपत्राबरोबर मूळ कागदपत्रे दाखल केली आहेत. आता मला पैठण कोर्टात आर.डी. क्र.१०/२०१८ या प्रकरणात दाखल केलेली ताबा पावती व ताबा पंचनामा दाखवण्यात आला. तसेच, एक एन.सी. तक्रार तसेच, गटक्रमांक ७५ संबंधीची खरेदीखताची सहीशिक्क्याची नक्कल दाखवण्यात आली वरील सर्व कागदपत्रांवर माझी सही आहे. (यावेळी वादीच्या विद्यमान वकीलांनी नमूद केले की, सर्व कादपत्रांवरील सहीच्या हद्दीपर्यंत निशाणी क्रमांक देण्यात यावा.) वर चारही कागदपत्रांमधील प्रस्तूत साक्षीदार हरीभाउ म्हस्के यांच्या **सहीला अनुक्रमे नि.क्र.७८ ते ८१** देण्यात येतो.

**सरतपास पूर्ण.**

**<u>प्रतिवादींतर्फे वकील श्री. उढाण यांच्यामार्फत साक्षीदार क्र.२ चा ऊलट तपास शपथेवर सूरू.</u>**

२. गटक्रमांक २८६ मध्ये एकूण पाच खातेदार आहेत. गटक्रमांक २८६ चा सातबारा मी पाहिला होता.

**प्रश्न –** गटक्रमांक २८६ मधील तुमचे किती क्षेत्र संपादीत झाले आहे?

**उत्तर –** एकूण ४ हेक्टर ८ आर क्षेत्र संपादीत झाले होते. तेव्हा मी व माझे वडील यांच्या नावाने सामाईक क्षेत्र होते.

संपादीत झालेल्या जमीनीच्या चतूसिमा खालीलप्रमाणे

| | | |
|---|---|---|
| **पूर्वेस** | – | सुधाकर आसमानराव म्हस्के |
| **पश्चिमेस** | – | सुदर्शन वसंतराव म्हस्के |
| **दक्षिणेला** | – | भिंमराज लक्ष्मण जायकर वसतराव दादाराव म्हस्के |
| **उत्तरेला** | – | वसंतराव दादाराव म्हस्के |

संपादीत जमीनीची नुकसान भरपाई (मावेजा) वादी सूधाकरने घेतली होती. संपादनावेळी माझे २ हेक्टर ४ आर क्षेत्र संपादीत झाले होते.

**प्रश्न** – प्रस्तूत दावा कशासाठी दाख आहे हे तूम्हाला सांगता येईल काय?

**उत्तर** – २५ क्विंटल कापूस चोरी झाला होता, मारहाण झाली होती व त्याचा एफ.आय. आर. क्र.३१२/२०२४ दाखल केला आहे.

३. माझ्या शपथपत्रात माझी दोन नावे नमूद आहेत कारण दत्तकपत्र होण्याआधी माझे नाव हरीभाउ आसमानराव म्हस्के होते व दत्तकपत्र झाल्यानंतर हरीभाउ मारोतराव उडदंगे असे आहे. मी १९८६ साली दत्तक गेलो. दत्तक गेल्यानंतर माझ्या नावे चंदनापूरी खूर्द येथील जमीन तसेच, कडेठाण येथील जमीन देखील माझ्या नावे झाली.

४. हे म्हणणे बरोबर आहे की, आज रोजी माझ्या साक्षीव्दारे जी चार कागदपत्रे दाखल करण्यात आली ती चंदनापूरी व कडेठाण येथील जमीनीसंबंधीची आहेत. हे म्हणणे बरोबर आहे की, मी दत्तक गेल्याने हरीभाउ मारोतराव उडदंगे या नावाने माझी कागदपत्रे असून त्याच नावाने मी सही करतो.

५. वादी सूधाकर यांना मूलबाळ नाही. मला एक मुलगा आहे. हे म्हणणे बरोबर आहे की, सूधाकर यांना मूलबाळ नसल्याने त्यांच्या मालमत्तेसंबंधी सर्व माझा मूलगा पाहतो व भविष्यात देखील सूधाकर यांची जमीन माझ्या मूलालाच मिळणार आहे. हे म्हणणे बरोबर नाही की, वादग्रस्त मिळकतीपैकी ८ एकर क्षेत्र २००३ पासून प्रतिवादींच्या ताब्यात आहे.

६. हे म्हणणे बरोबर आहे की, नि.दि.दा. क्र.३२९/२०२४ मध्ये मी प्रतिवादी असून स्वत:हून हजर झालो. हे म्हणणे बरोबर नाही की, मी त्या दाव्यात हजर झाल्यानंतर या दाव्यातील वादीसोबत संगनमत करून प्रस्तूत दावा दाखल केला.

७. हे म्हणणे बरोबर नाही की, दि.२७.०३.२०१८ रोजी मी – सम्मती देणार म्हणून व वादी यांनी लिहून देणार म्हणून प्रतिवादी क्र.१ च्या नावे गटक्रमांक २८६ मधील ८ एकर जमीनीचा करारानामा लिहून दिला. हे म्हणणे बरोबर नाही की, माझी दोन नावे असल्याने मी माझ्या सोयीनूसार कधी हरीभाउ आसमानराव म्हस्के म्हणून तर कधी हरीभाउ मारोतराव उडदंगे म्हणून सही करतो.

८. हे म्हणणे बरोबर नाही की, मी माझ्या सोयीनूसार दि.२७.०३.२०१८ रोजीच्या करारावर "हरीभाउ आसमानराव पा " म्हणून सही केली. हे म्हणणे बरोबर आहे की, जेव्हा मी

उडदंगे म्हणून सही करतो तेव्हा नावापूढे "पा" लावतो.

९. माझ्या शपथपत्रातील परीच्छेद क्र.५ मधील चौथ्या ओळीत "मूलीस" असा शब्द नमूद आहे. साक्षीदार म्हणतो की, तेथे "मूलास" असे पाहिजे होते. हे म्हणणे बरोबर नाही की, मी शपथपत्र न वाचता सही केली. हे म्हणणे बरोबर नाही की, वादी माझे सख्खे बंधू असल्यामूळे मी आज रोजी त्यांच्या सांगण्यावरून साक्ष देण्यासाठी आलो आहे. हे म्हणणे बरोबर नाही की, वादीने जी फिर्याद दाखल केलेली आहे ती खोटी फिर्याद आहे. हे म्हणणे बरोबर नाही की, खोटे शपथपत्र दाखल करून मी आज रोजी खोटी साक्ष देत आहे.

**उलटतपास पूर्ण.**
**फेरतपास नाही.**

श्रवणोत्तर स्विकृत

स्वा/-
(एस. एस. जैन)
सह दिवाणी न्यायाधीश (क.स्तर),
अंबड

दिनांक:१८/०२/२०२६